## आतील पानात वाचा


- खड्डेच खड्डे चोहीकडे... गेला रस्ता कुणीकडे...?
- निफाड तालुक्यात अनुदानित खताचा मोठा काळाबाजार उघडकीस...
- तीन दिवसांत साईचरणी तब्बल ८ कोटींचे दान



दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध    Email : newsaksharaj2021@gmail.com



वर्ष : ०५ | अंक : ३५३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०३ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# ऑगस्ट महिन्यात मोठा पाऊस येणार, राज्यभरात धुमाकूळ घालणार : पंजाबराव डख

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, मुंबई :** राज्यात गेल्या आठवड्याभरात पावसाने धुमाकूळ घातलेला बघायला मिळाला. यानंतर पावसाचा वेग मंदावणार आहे. पुढचे काही दिवस राज्यात वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये पाऊस पडेल. पण त्याची तिव्रता जास्त राहणार नाही. हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी याबाबत महत्त्वाचा अंदाज वर्तवला आहे. राज्यात १५ ऑगस्टपर्यंत विविध जिल्ह्यांमध्ये थोडाफार पाऊस पडेल. पण त्यानंतर पुढच्या १५ दिवसांत पुन्हा मोठा पाऊस येणार आहे. बंगालच्या खाडीत कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार आहे. त्यामुळे राज्यात पाऊस पुन्हा धुमाकूळ घालेल, असं पंजाबराव डख यांनी म्हटलं आहे.

राज्यात आजपासून पावसाचा जोर ओसरणार आहे आणि ठिकठिकाणी सूर्यदर्शन होणार आहे. त्यामुळे शेतीची कामे करुन घेण्यासाठी पोषक वातावरण निर्माण होणार आहे. असं असलं तरी ६ ऑगस्टपर्यंत स्थानिक वातावरण तयार होऊन १० मिनिटे ते अर्धा तासाचा पाऊस होऊ शकतो. असा पाऊस दुपारनंतर येईल. पण मुसळधार किंवा अतिवृष्टीसारखा पाऊस येणार नाही, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला.

**बंगालच्या खाडीत कमी दाबाचा पट्टा तयार होणार**

७ ऑगस्टनंतर वातावरणात आणखी बदल होईल. चांगलं सूर्यदर्शन होईल. शेतकऱ्यांना १५ ऑगस्टपर्यंत शेतीची कामे करण्यासाठी वेळ मिळणार आहे. पण १६ ते १७ ऑगस्टच्या काळात बंगालच्या खाडीत परत कमी दाबाचा पट्टा तयार होणार आहे. आपल्याकडे उन्हाची तीव्रता राहील त्यावेळी तो कमी दाबाचा पट्टा महाराष्ट्रात येईल. त्यावेळी पुन्हा राज्यातील काही भागांमध्ये मुसळधार पाऊस पडेल, असं भाकीत पंजाबराव डख यांनी वर्तवलं आहे.

**१७ ते ३० ऑगस्ट दमदार पावसाची शक्यता**

ऑगस्ट महिन्यात देखील चांगला मोठा पाऊस येणार आहे. १७ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट दरम्यान चांगला पाऊस पडेल. सोलापूर, बीड, लातूर, धाराशिव, परभणी, नांदेड या जिल्ह्यांमध्ये कमी पाऊस पडला आहे. या जिल्ह्यांपैकी वेगवेगळ्या जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ७ ऑगस्टपर्यंत दररोज थोडाफार पाऊस पडण्याची शक्यता आहे, असं डख यांनी सांगितलं.




**कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता?**

धाराशिव, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम, नांदेड, अमरावती, अकोला, बुलढाणा, चिखली, सिंदखेडराडा, मालेगाव, नांदुरा, अकोट या भागांमध्ये दुपारपर्यंत ऊन राहील. दुपारनंतर २० मिनिटांचा पाऊस पडू शकतो. शेतकऱ्यांनी १५ ऑगस्टपर्यंत शेतीचे कामे करुन घ्यावेत. तसेच सप्टेंबर-ऑक्टोबरला परतीचा भरपूर पाऊस पडणार आहे, असा मोठा दावा पंजाबराव डख यांनी केला.

**'पावसाचा खंड पडणार नाही'**

सोशल मीडियावर पावसाचा खंड पडणार असल्याच्या अफवा पसरवल्या जातात. महाराष्ट्रात कुठेच पाऊस पडला नाही तर त्याला खंड म्हणतात. राज्यात ७ ते ८ ऑगस्टपर्यंत थोडाफार पाऊस सुरु राहणार आहे. ७ ऑगस्टपर्यंत कोकण किनारपट्टीवर पाऊस सुरु राहील. त्यानंतर १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलढाणा इथे थोडा-थोडा पाऊस येत राहील. पावसाचा खंड पडणार नाही. पाऊस महाराष्ट्रात चालूच राहील, अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली.

# जैववैद्यकीय कचरा वाढला ; दिवसाला ९ हजार किलो कचऱ्याचे संकलन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, पुणे :** गेल्या पाच वर्षांत झालेला वैद्यकीय क्षेत्राचा विस्तार, मध्यवर्ती शहरासह उपनगरे, समाविष्ट गावांमध्येही पसरलेली रुग्णालये, गल्लीबोळात सुरू झालेल्या पॅथॉलॉजी लॅब, मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलची वाढलेली संख्या आणि मेडिकल टुरिझमला मिळणाऱ्या प्रतिसादामुळे शहरात दररोज निर्माण होणाऱ्या जैववैद्यकीय कचऱ्यामध्ये (बायोमेडिकल वेस्ट) दुपटीने वाढ झाली आहे. शहरात सध्या दररोज सुमारे नऊ हजार ४८५ किलो जैववैद्यकीय कचरा निर्माण होत आहे. करोना साथीपूर्वी संकलित होणाऱ्या कचऱ्याच्या तुलनेत हा दुपटीहून अधिक आहे.

प्रमाण नऊ हजार किलोच्याही पुढे गेले आहे.

महापालिकेच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'पर्यावरण सद्यस्थिती अहवाल २०२५-२६'मध्ये जैववैद्यकीय कचऱ्याचा लेखाजोखा मांडण्यात आला आहे. पुण्यात कैलास स्मशानभूमी परिसरात महापालिकेचे अधिकृत समायिक जैववैद्यकीय कचरा




प्रक्रिया केंद्र कार्यरतआहे. सन २०२०मध्ये शहरात दररोज तीन ते साडेतीन हजार किलो जैववैद्यकीय कचऱ्याचे प्रमाण होते; पण आता हे प्रमाण नऊ हजार किलोच्याही पुढे गेले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार, प्रतिखाट दररोज २५० ते ५०० ग्रॅम कचरा निर्माण होणे अपेक्षित असते.

**कचरा सातत्याने वाढतो आहे.**

शहरात सध्या प्रतिखाट प्रतिदिन ३०३ ग्रॅम कचरा निर्माण होत असून; हे प्रमाण जागतिक निदर्शक मर्यादेत आहे, पण शहराचा वाढता विस्तार पाहता दैनंदिन कचऱ्यात उल्लेखनीय वाढ होते आहे. वैद्यकीय क्षेत्राचा विस्तार व मेडिकल टुरिझम, रुग्णालांची संख्या आणि उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांचा ओघ, शहर आणि समाविष्ट गावांमध्ये डायग्नोस्टिक सेंटर्स, ब्लड कलेक्शन सेंटर्स आणि पॅथॉलॉजी लॅबची संख्या वाढल्याने हा कचरा सातत्याने वाढतो आहे.

**किरण कुलकर्णी यांची प्रतिक्रिया**

पुण्यातील सर्व लहान- मोठ्या पॅथेलॉजी लॅबपासून ते मिल्ट स्पेशालिस्टी हॉस्पिटलपर्यंत सगळीकडे तयार होणारा जैववैद्यकीय कचरा संकलित करुन आमच्या

केंद्रात पाठवला जातो.समाविष्ट गावांमधील कचराही येतो आहे. विस्तारलेल्या वैद्यकीय क्षेत्रामुळे या कचऱ्याचे प्रमाण वाढले आहे. पुढील आठ ते दहा वर्षांच्या विचार करून आम्ही यंत्रणा विकसित केली असून, त्यामुळे कचरा वाढला, तरी विल्हेवाटीस अडथळा येणार नाही असे अशी प्रक्रिया प्रकल्प प्रमुख किरण कुलकर्णी यांनी दिली.

# जिल्ह्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आ.सुधीर मुनगंटीवार सरसावले



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीत शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी तातडीने पुढाकार घेतला आहे. मुल, बल्लारपूर, पोंभूर्णा, चंद्रपूरसह अनेक तालुक्यांतील शेती, घरे, जनावरे, शेतबांध, रस्ते तसेच वर्धा व इरई नदीकाठच्या गावांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची गंभीर दखल घेत आ.मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पत्र पाठवून तात्काळ पंचनामे करून बाधितांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल), अतिरिक्त मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) तसेच मुख्य सचिव आणि महसूल आयुक्त (नागपूर) यांना पत्र पाठवून चंद्रपूर जिल्ह्यातील परिस्थितीची माहिती देत नुकसान भरपाई देण्यासंदर्भाची मागणी केली आहे. यासोबतच चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. पत्रात आ.मुनगंटीवार यांनी नमूद केले आहे की, सलग चार दिवसांच्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर शेती पाण्याखाली गेली असून उभी पिके उद्ध्वस्त झाली आहेत. अनेक ठिकाणी घरे, गोठे, शेतबांध, रस्ते व इतर मालमत्तेचे नुकसान झाले आहे. वर्धा आणि इरई नद्यांना आलेल्या पुरामुळे नदीकाठच्या गावांमध्ये पाणी शिरून शेतीसह गावांनाही मोठा फटका बसला आहे. त्यामुळे महसूल व कृषी विभागाने तातडीने संयुक्त पाहणी करून नुकसानीचे पंचनामे पूर्ण करावेत आणि शासनाच्या नियमांनुसार नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना त्वरित आर्थिक मदत आणि नुकसानभरपाई अदा करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. याशिवाय, ज्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे त्या भागांसाठी विशेष मदत जाहीर करून अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याचीही आ.मुनगंटीवार यांनी मागणी केली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी व नागरिकांना तातडीने दिलासा मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच शासनाने या गंभीर परिस्थितीची संवेदनशीलतेने दखल घेऊन तातडीने आवश्यक निर्णय घ्यावेत, असे पत्रात नमूद केले आहे.

# विदर्भात पुरामुळे नऊ जणांचा करुण अंत!

## मृतांमध्ये ३ मुलांचा समावेश, पिकांचे मोठे नुकसान, रस्ते वाहतूक विस्कळीत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, नागपूर :** मुसळधार पावसामुळे नद्यांना पूर येऊन दोन दिवसांत विदर्भाच्या विविध भागांत नऊ नागरिकांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये तीन मुलांचाही समावेश आहे. पुराच्या पाण्याचा फटका बसल्याने हजारो एकरांवरील पिकांचे नुकसान झाले असून, काही जिल्ह्यांत रस्ते वाहतूकही प्रभावित झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गडचिरोली जिल्ह्यात सती नदीत बुडून तीन मुलांचा मृत्यू झाला. बुलढाणा जिल्ह्यात पुरात वाहून दोघांचा, तर मासे पकडताना एका तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. वर्धा जिल्ह्यातील पवनार येथे धाम नदीत एक युवक वाहून गेला. भंडारा जिल्ह्यात कालव्यात पडून एका शेतकऱ्याचा, तर यवतमाळ जिल्ह्यात नाल्याच्या पुरात बुडून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला.

गडचिरोली जिल्ह्याच्या कुरखेडा तालुक्यातील राणी खेडेगाव येथे शनिवारी दुपारी आई-वडील धान रोवणीच्या कामासाठी शेतात गेले असताना गावातील



चार मुले सती नदीवर आंघोळीसाठी गेली. यावेळी नदीच्या पाण्याची पातळी वाढलेली होती. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तिघे खोल पाण्यात गेले आणि बुडाले. चौथा मुलगा सुदैवाने बचावला. लक्ष्मण सुन्हेर दूधकवर (वय ६), कुणाल रमेश दूधकवर (वय ५) आणि मोहित हिवराज सराटे (वय ११) अशी मृतांची नावे आहेत.

बुलढाणा जिल्ह्याच्या नांदुरा तालुक्यातील इसापूर येथील फुलकराम जानकीराम काळे (वय ५०) आणि जळगाव शहरातील सिद्धार्थनगरमधील रहिवासी महादेव जगदेव वाघोदे यांचा पुराच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला. संग्रामपूर तालुक्यातील चांगेफळ शिवारात बेंबळा नदीपात्रात मासे पकडताना अचानक पाण्याचा प्रवाह वाढला. त्यात वाहून गेल्याने सूरज तेरसिंग भाबर (वय २६) याचा मृत्यू झाला.

वर्धा जिल्ह्यातील पवनार येथील धाम नदी परिसरात पाय घसरून गायमुख कुंडात पडल्याने प्रशांत प्रभाकर माणुसमारे (वय ३५) हा युवक बुडाला. ही घटना शुक्रवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली.

भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यातील कुडेगाव येथे शेतात जाताना चिखलात पाय घसरून कालव्यातील खड्ड्यात पडल्याने एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली. प्रमोद ईश्वर ठाकरे (वय ३०) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

यवतमाळ तालुक्यातील खैरी गावातील एका शेतकऱ्याचा नाल्याच्या पुरात बुडून मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. मारोती अय्या आत्राम (वय ४८) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

**पावसाचा जोर ओसरणार !**

गेल्या आठवड्यात विदर्भाच्या बहुतांश भागांत दमदार हजेरी लावल्यानंतर पुढील काही दिवस पावसाचा जोर कमी होण्याची शक्यता आहे, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दरम्यान, विदर्भातील अनेक जिल्ह्यांत पूरस्थिती निर्माण झाली असली, तरी धरणांच्या पाणीसाठ्यात अद्याप समाधानकारक वाढ झाली नसल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# केंद्राकडून 'यूआरएस' कांदा खरेदी बंद

**दि.०२, नाशिक :** केंद्र सरकारने कांदा खरेदीच्या धोरणात अचानक बदल करीत यूआरएस श्रेणीच्या कांद्याची खरेदी ३० जुलैपासून पूर्णत: बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे नाशिक जिल्हा आणि राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या नव्या निर्णयानुसार आता केवळ 'अ' श्रेणीच्या चांगल्या प्रतीच्या कांद्याचीच खरेदी केली जाणार आहे.

यासोबतच सरकारने किंमत स्थिरता निधीअंतर्गत खरेदी केल्या जाणाऱ्या कांद्याचा दर प्रतिक्विंटल दोन हजार ३३५ रुपये, असा सुधारित केला आहे. नाफेड आणि 'एनसीसीएफ' या दोन्ही केंद्रीय खरेदी संस्थांना २५ मेपासून महाराष्ट्रात पाच लाख टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. सुरुवातीच्या काळात या संस्थांनी चांगल्या कांद्यासोबतच यूआरएस म्हणजेच लहान आणि काहीसा डागी स्वरूपाचा कांदाही खरेदी केला होता. मात्र, आता अचानक ही खरेदी थांबवण्यात आल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. परराज्यातील कांदा खपविण्याचा प्रयत्न चांदवड तालुक्यातील मंगरूळ येथे परराज्यातून आणलेला निकृष्ट दर्जाचा कांदा नाफेड खरेदी केंद्रावर खपविण्याचा प्रयत्न उघडकीस आला. स्थानिक शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर तहसीलदार अनिल चव्हाण यांच्या आदेशाने महसूल, कृषी विभाग व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संयुक्त पथकाने गुरुवारी रात्री शेडवर धाड टाकली. विश्वजित शाहू यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये इंदोर येथून आणलेला १० ते २० मिमी आकाराचा चिंगळी व गोल्टी कांदा आढळला. धुळे येथील संजयकुमार बाबूलाल अग्रवाल यांनी कांदा इंदोरहून आणल्याचे मान्य केले. पथकाने सुमारे ६०० क्विंटल कांदा जप्त केला असून, नायलॉन बारदान पिशव्याही आढळल्या. स्थानिक शेतकऱ्यांचा माल डावलून बाहेरील हलका कांदा घुसविला जात असल्याचा आरोप आहे. तहसीलदारांनी नाफेडला सखोल चौकशी व कारवाईचे निर्देश दिले.

अक्षराज






## समतेच्या लढ्याचे दिग्दर्शक

ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नाही, तर कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे. हे अजरामर वाक्य देणारे उपेक्षितांचे इतिहासकार, अण्णा भाऊ साठे हे केवळ एक साहित्यिक नव्हते, तर ते समाजातील शोषित, पीडित आणि वंचित घटकांचे खरे प्रतिनिधी होते. हजारो वर्षे अन्याय सहन करणाऱ्या समाजाला त्यांनी एक बुलंद आवाज दिला. त्यामुळे साहित्यरत्न - अण्णा भाऊ साठे यांची जयंती ही केवळ एका समाज परिवर्तनवादयाची जयंती नसून सामाजिक न्याय, समता आणि मानवी स्वाभिमानाचा जागर करण्याचा दिवस आहे. अण्णा भाऊंचा जन्म अत्यंत गरीब कुटुंबात झाला. त्यांना शिक्षणाची संधी मिळाली नाही.त्यानी अपार कष्ट आणि जातीय विषमता अनुभवली. त्यामुळे त्यांची लेखणी वास्तवाच्या स्पर्षातून पाझरली. त्यामुळेच त्यांनी आपल्या आजूबाजूला जगणाऱ्या माणसांचा इतिहास लिहिला.

भारतीय इतिहास लिहिताना अनेकदा राजे, सरदार, युद्धे आणि सत्ताधीश यांचाच उल्लेख केला जातो. मात्र झोपडपट्टीत राहणारा मजूर, कामगार, ऊसतोड भटका-विमुक्त, दलित, कष्टकरी की,ज्यांचे हातावर पोट आहे,यांचाही इतिहास असतो, हे अण्णा भाऊनी आपल्या प्रकांड पांडित्याने पहिल्यांदाच सिद्ध केले. म्हणूनच त्यांना उपेक्षितांच्या मानवमुक्तीचे दिग्दर्शक मानले जाते.

'फकिरा', 'वारणेचा वाघ', 'माकडीचा माळ', 'चिखलातील कमळ' यांसारख्या कादंबऱ्यांमधून त्यांनी अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सामान्य माणसाचे चित्र उभे केले. त्यांच्या लेखणीतून आपणाला संघर्ष आणि परिवर्तनाचा संदेश मिळतो. त्यांचे साहित्य आणि कार्य मानसाला अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत सामाजिक न्यायाचे तत्त्व स्वीकारले. अनुसूचित जाती-जमाती, मागासवर्गीय समाज आणि वंचित घटकांना शिक्षण, नोकरी आणि प्रतिनिधित्वामध्ये आरक्षण देण्यामागे शतकानुशतके झालेल्या सामाजिक अन्यायाची भरपाई करण्याचा उद्देश त्यामध्ये अनुस्युत होता,हे नाकारता येणार नाही. उपवर्गीकरण म्हणजे कोणाचाही हक्क हिरावून घेणे नव्हे. उपवर्गीकरण म्हणजे आरक्षणाचे लाभ अनुसूचित जातींतील सर्व समाजघटकांपर्यंत न्याय्य आणि समतोल पद्धतीने पोहोचविण्याची व्यवस्था होय.

सामाजिक न्याय म्हणजे सर्वांना सारखे वाटप करणे नव्हे; तर जो सर्वाधिक मागे राहिला आहे, त्याला पुढे येण्याची संधी उपलब्ध करून देणे होय. भारतीय राज्यघटनेचा आत्माही हाच आहे. त्यामुळे उपवर्गीकरण ही सामाजिक न्यायाच्याविरोधी संकल्पना नसून सामाजिक न्याय अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न आहे. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी आयुष्यभर समाजातील शेवटच्या माणसासाठी लेखणी चालवली. त्यांनी नेहमी वंचित, पीडित आणि दुर्लक्षित समाजाचा आवाज बुलंद केला. त्यामुळे आज जर ते हयात असते, तर आरक्षणाच्या लाभापासून अजूनही वंचित असलेल्या समाजघटकांच्या प्रश्नांवर त्यांनी नक्कीच भाष्य केले असते. सामाजिक न्यायाची प्रक्रिया अधिक व्यापक, अधिक समतोल आणि अधिक परिणामकारक करण्यासाठी हा विचार महत्त्वाचा ठरतो. अण्णा भाऊंच्या जयंतीनिमित्त त्यांनी मांडलेल्या समता, स्वाभिमान, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांना प्रत्यक्ष जीवनात उतरविण्याचा संकल्प करायला हवा. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत विकासाच्या संधी पोहोचल्या, शिक्षण सर्वांसाठी खुले झाले, रोजगारामध्ये समान प्रतिनिधित्व मिळाले आणि प्रत्येक वंचित घटकाला न्याय मिळाला, तरच अण्णा भाऊंच्या विचारांचा खरा विजय झाला असे आपल्याला म्हणता येईल.आजच्या भारताला अण्णा भाऊंच्या सामाजिक न्यायाच्या विचारांची पूर्वीपेक्षा अधिक गरज आहे. कारण समाज तेव्हाच मजबूत होतो, जेव्हा सर्वात दुर्बल माणूसही सन्मानाने उभा राहतो.अण्णा भाऊंचा समताधिष्ठित विचार हा याच सामाजिक समतेच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरू शकतो. अण्णा भाऊंच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करताना समाजातील प्रत्येक वंचित घटकापर्यंत न्याय पोहोचविण्याचा संकल्प करू या. असे झाले तर आणि तरच त्यांना खरी मानवंदना ठरेल!

**- डॉ.राज ताडेराव**

# सरकारचे ईपीएस-९५ पेंशन धारकांवरील दुर्लक्ष म्हणजे जेष्ठ नागरिकांची खुली थट्टाच!

२०१४ पासुन ईपीएस पेंशन धारक फक्त जगण्याइतकी इतकी पेन्शनची मागणी करीत आहे. परंतु सरकार प्रत्येक अधिवेशनात डोळे बंद करून फक्त तमाशा पहात आहे.जेष्ठ नागरिक ईपीएस पेंशन धारक कमीत कमी ७५०० पेंशन व महागाई भत्ता मिळावा यासाठी वृध्दापकाळात सुध्दा संघर्ष करीत आहे.परंतु सरकारच्या नाकावरील माशी सुद्धा उडतांना दिसत नाही हे जेष्ठांच्या प्रती दुर्भाग्य म्हणावे लागेल.सरकार निवडणुकीच्या काळात मतदारांना लॉलीपॉप देवून अनेक मोफत योजना अंमलात आणते.परंतु देशाचा शिल्पकार कामगार वर्ग फक्त जगण्याइतकी पेन्शनची मागणी करते तेव्हा सरकार प्रत्येक अधिवेशनात पाठ फिरवितांना दिसते.देशात वाढती महागाई,वाढता औषधोपचार, वाढते कर आणि वाढत्या प्रदूषणामुळे वृध्दापकाळातील ढासळते आरोग्य यांनी ईपीएस-९५ पेंशन धारक अत्यंत त्रासलेला असुन ग्रस्त आहे.कारण अल्पशा पेंशनमध्ये पेन्शन धारक कोणतेही काम पूर्ण करूच शकत नाही.यावर सरकारने कानांवर हात ठेवले आहे व तोंडावर बोट ठेवले आहे यावरून स्पष्ट होते की, सरकारला ईपीएस ९५ पेंशन धारकांशी काहीही देणेघेणे नाही.त्यामुळे सरकारला विनंती आहे की,आपण जर या गंभीर समस्येवर तोडगा काढूच शकत नसेल तर स्वेच्छा मरणाची परवानगी दिली पाहिजे.याचे स्वागत आम्ही ईपीएस पेंशन धारक आनंदाने करू. गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे.यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले.सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री ,खासदार,आमदार, प्रशासकीय विभाग यांना निवेदनाच्या माध्यमातून सरकारपर्यत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले.त्यामुळे या पावसाळी अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील करोडो वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही पावसाळी अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब आहे.अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरूच आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दुःख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही.ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे.केंद्र सरकार मोठमोठ्या गोष्टी करत आहेत परंतु वृध्दांकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे. ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल या आशेने आतापर्यंत उम्मीद टीकुन होती.परंतु सरकार मिनिमम पेंशन बद्दल एकही शब्द बोलायला तयार नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत,मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या पावसाळी अधिवेशनात दिसून आले.आज देशातील करोडो ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.सरकार महागाई वाढवीते तेव्हा कोणाचाही विचार न करता भरमसाठ महागाई वाढविते आणि ईपीएस पेंशन धारक फक्त ७५०० रूपये पेन्शन मागते तेव्हा सरकार पाठ फिरविते ही कुठली लोकशाही म्हणावी.आज सरकारने महागाईचा मोठा डोंगर उभा केला आहे यात सर्वसामान्य व पेंशन धारक दबलेला आहे.यामुळे अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स,वाढती महागाई, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा १००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य सरकारला का दिसत नाही? सरकार एवढी निर्लज्ज का झाली?पेंशन धारकांची मागणी होती की, कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा मिळावी. परंतु वित्त मंत्री निर्मला सिताराम यांनी संपूर्ण ईपीएस-९५ पेंशन धारकांना निराश केल्याचे स्पष्ट दिसून येते आहे.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर, महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने या पावसाळी अधिवेशनात घेणे गरजेचे होते. परंतु सरकारने याला यत्किंचितही महत्व दिले नाही ही अत्यंत दुःखद बाब आहे. वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस- १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले.केंद्र सरकारने आतापर्यंत करोडो ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले होते. कारण पेन्शन ही त्यांच्या म्हारपणाची शीदोरी आहे. त्यामुळे पेन्शन हे जीवन-मरणाचे साधन सुध्दा आहे. याबाबदची सुध्दा सरकारने जान ठेवली नाही. सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता कोणत्याही योजनेअंतर्गत कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय आतातरी घ्यावा.आता पेन्शन धारकांच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ




आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.परंतु आज १४५ कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी करोडो पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा अरबो रूपया सरकारजवळ आहे हा पैसा सरकार लोकप्रतिनिधीच्या पगारासाठी,पेन्शनसाठी व इतरत्र वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना भिक दील्यासारखी पेंशन देत आहे. ही लोकशाहीला काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दुःख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे.राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू असतात व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वाढले की राजकीय पुढाऱ्यांचे पगार व पेंशन वाढतात याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही देर आज दुरूस्त आए ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले.तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते. पावसाळी अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली. ईपीएफओ चा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते. कारण देशाच्या विकासाकरीता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न करोडो पेन्शन धारकांपुढे उपस्थित होतो.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की आपलाच पैसा आपणच चोर. त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्नक आहे की जगावे की मरावेअशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे.त्यामुळे सरकारने ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत. त्यामुळे पेन्शन धारकांना विश्वास आहे की ईपीएस-९५ पेन्शन धारकांचा प्रश्न अवश्य सुटेल.पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे.सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे.त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे. शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा शिल्पकार आहे याची जाण केंद्र सरकारने ठेवली पाहिजे.राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो.केंद्र सरकारने ज्याप्रमाणे आठव्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी दिली.त्याचप्रमाणे ईपीएस-९५ पेंशन बद्दल सरकारने ठोस निर्णय घेतला पाहिजे. मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत.परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत पक्ष-विपक्षाच्या अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दाला गांभीर्याने घेऊन कमीत कमी ७५०० रूपये पेंशन जाहीर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या करोडो पेंशन धारकांना आहे.सरकारला यावर काहीच निर्णय घ्यायचा नसेल तर ईपीएस पेंशन धारकांना सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी याचेही आम्ही स्वागत करू.

जय हिंद! जय भारत.

**लेखक.**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## खरे खोटे

खरी बाजू मांडाया
हवाय हुशारवकील
दोनदा हरलातरीही
पुन्हा करेल अपील

बाजू खोटी असता
अगदी रहावे चील
आपणचं लढू केस
नक्की बा जिंकील

सत्यचं फालतू सत्य
खोटे पटवूनि देईलं
कसे हरवले सत्यां
श्रेय स्वताचं घेईलं

खोटे सहजी पटते
नीत सरशी होईलं
खोटे नाणे चमकते
ऐटीत चालू जाईलं

खोटेअसे लुभावणे
लक्ष सहज मोहील
खरे मात्र रांगे मध्ये
कायम उभे राहीलं

खरे कडवट औषधं
रोग संपूनि टाकीलं
खोटे मधाळ आवडे
रोगीच संपून जाईलं

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# खड्डेच खड्डे चोहीकडे... गेला रस्ता कुणीकडे...?

पाऊस आणि रस्त्यांवरील खड्डे हे आता जणू समीकरणच बनले आहे. थोडासा पाऊस झाला की रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडतात. दरवर्षी पावसाळ्यात मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिकसह राज्यातील जवळपास सर्वच शहरांमध्ये खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण होते. यंदाही परिस्थिती वेगळी नाही. काही ठिकाणी तर रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यांत रस्ता, हेच ओळखू येत नाही.

ही समस्या केवळ शहरांपुरती मर्यादित नाही. राज्य व राष्ट्रीय महामार्गांवरही मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. मग ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था किती बिकट असेल, याची कल्पनाच केलेली बरी. परिणामी वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. दुचाकीस्वार, रुग्णवाहिका, शालेय बस आणि सामान्य नागरिक यांना रोज जीवघेण्या प्रवासाला सामोरे जावे लागत आहे.

रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे दरवर्षी शेकडो अपघात होतात. अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागतो. नाशिकमध्ये खड्ड्यांमुळे चार नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत वेदनादायी आहे. केवळ नाशिकच नव्हे, तर देशातील अनेक शहरांमध्ये खड्ड्यांमुळे जीवितहानी होत आहे. तरीही जबाबदार यंत्रणांची संवेदनशीलता जागी होताना दिसत नाही.

दरवर्षी शासन रस्ते बांधणी व दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करते. मग एवढा पैसा खर्च होऊनही रस्ते काही महिन्यांतच उखडतात कसे? याचे उत्तर निकृष्ट दर्जाचे काम,



भ्रष्टाचार आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणात दडलेले आहे. ठेकेदार, संबंधित अधिकारी आणि काही लोकप्रतिनिधी यांच्या साटेलोट्यामुळे जनतेचा पैसा अक्षरशः खड्ड्यांत जात आहे.

पावसाळ्यात नागरिकांच्या तक्रारी वाढल्या की खड्ड्यांवर तात्पुरते डांबर टाकून दिखाऊ दुरुस्ती केली जाते. काही दिवसांनी पुन्हा तेच खड्डे उघडे पडतात आणि पुन्हा नव्या कामाच्या नावाखाली निधी खर्च होतो. त्यामुळे खड्डे हे काही ठेकेदारांसाठी सोन्याची अंडी देणारी कोंबडी ठरले आहेत, अशी भावना नागरिकांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे.

यावर कायमस्वरूपी उपाय करायचा असेल तर केवळ घोषणांनी भागणार नाही. ज्या ठेकेदाराच्या कामात दोष आढळतील त्याला काळ्या यादीत टाकले पाहिजे. निकृष्ट कामाला प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. संबंधित लोकप्रतिनिधींनाही जबाबदार धरले पाहिजे. आवश्यक असल्यास निकृष्ट रस्त्यांचा संपूर्ण खर्च दोषींकडून वसूल करण्याची कठोर तरतूद केली पाहिजे.

रस्ते हे विकासाचे प्रतीक असतात; पण तेच मृत्यूचे सापळे बनत असतील, तर तो विकास नव्हे, तर व्यवस्थेचा पराभव आहे. शासनाने ठेकेदार, अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या अभद्र युतीवर कठोर कारवाई केली, तरच खड्डेमुक्त महाराष्ट्र हे स्वप्न साकार होईल. अन्यथा दरवर्षी पाऊस पडेल, खड्डे पडतील, अपघात होतील आणि आश्वासनेही तशीच पडून राहतील.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड, जि. पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# निफाड तालुक्यात अनुदानित खताचा मोठा काळाबाजार उघडकीस; लासलगाव पोलिसांची तब्बल ८८ लाखांची कारवाई

## शेतकऱ्यांसाठीचे अनुदानित उरलेले खत इंडस्ट्रियल गोण्यांमध्ये भरून विक्रीचा डाव; दोन आरोपी अटकेत, दोन वाहनांसह मोबाईल जप्त





**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** शासनाने शेतकऱ्यांसाठी अनुदानित दरात उपलब्ध करून दिलेल्या खताचा गैरवापर करून त्याची काळ्या बाजारात विक्री करण्याचा मोठा डाव लासलगाव पोलीस आणि कृषी विभागाने उधळून लावला आहे. विष्णुनगर (ता. निफाड) येथील एका कांद्याच्या खळयात करण्यात आलेल्या या धाडीत तब्बल८८ लाख ३६ हजार ६२४ रुपयेकिमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

**नेमकी घटना काय?**

दिनांक ०१ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २:३० वाजेच्या सुमारास विष्णुनगर येथील हॉटेल न्यू क्रांतीच्या पाठीमागे असलेल्या कांद्याच्या खळयात अनुदानित खतांची हेराफेरी सुरू असल्याची माहिती मिळाली होती. कृषी अधिकारी व खत निरीक्षक संदीप दिलीप मोगल (पंचायत समिती, निफाड) यांनी पोलीस पथकासह त्या ठिकाणी अचानक छापा टाकला. तपासादरम्यान असे दिसून आले की, आरोपीज्ञानेश्वर दगु पवार (वय ३७, रा. विंचूर)आणिसागर किशोर गरड (वय २७, रा. विंचूर)यांनी संगणमत करून शेतकऱ्यांसाठी अत्यंत स्वस्त दरात असणाऱ्या अनुदानित युरिया खताचा साठा इंडस्ट्रियल (औद्योगिक) वापराच्या महागड्या गोण्यांमध्ये भरून काळ्या बाजारात विकण्याचा कट रचला होता.

**जप्त करण्यात आलेला मुद्देमाल (एकूण किंमत: ₹८८,३६,६२४/-):-**

**१) अनुदानित युरिया :-** आयशर टेम्पोमध्ये (चक२३ अण-५१९३) मिळून आलेल्या २६४ पिवळ्या गोण्या (RCF भारत युरिया - किंमत ₹७०,२२४/-

**२) इंडस्ट्रियल युरिया गोण्या :-** टाटा ट्रकमध्ये (चक-५७ इ-६७७७) भरलेल्या ४६४ सफेद गोण्या ('Technical Grade Urea' - किंमत ₹११,६०,०००/-

**३) वाहने :-** आयशर टेम्पो झठज ३०१८ (किंमत ₹२५,००,०००/-) टाटा ट्रक (किंमत ₹५०,००,०००/-)

**४) इतर साहित्य :-** खत भरण्यासाठी आणलेल्या नवीन व जुन्या रिकाम्या गोण्या, गोण्या शिवण्याचे 'रेंबो' कंपनीचे मशिन (किंमत ₹३,०००/-)

**५) मोबाईल :-** आरोपींकडून जप्त केलेले सॅमसंग ड-२४ अल्ट्रा, सॅमसंग अ३७६श व ओप्पो कंपनीचे ३ मोबाईल (किंमत ₹१,००,०००/-).

**विविध कलमांन्वये गुन्हे दाखल**

या प्रकरणी खत निरीक्षक संदीप मोगल यांच्या फिर्यादीवरून लासलगाव पोलीस ठाण्यात:अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ (कलम ३, ७, ८, ९, १०) खत नियंत्रण आदेश १९८५खत (वाहतूक/हाताळणी) नियंत्रण आदेश १९७३ भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३च्या कलम ३१८(४) व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तपास पथक**

ही धडक कारवाई नाशिक ग्रामीणच्या पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षकसागर कोते, पोलीस उपनिरीक्षककिरण साळुंके, हवालदार अरुण डोंगरे, उत्तम गोसावी, पोलीस शिपाई सागर आरोटे, अवधूत होंडे, संदीप डगळे, कैलास घोलप तसेच कृषी विभागाचे संदीप मोगल, दीपक सोमवंशी आणि हितेश पगार यांच्या पथकाने केली.

प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक साळुंके करत आहेत. शेतकऱ्यांच्या हक्काच्या खताचा काळाबाजार करणाऱ्यांवर अशाच प्रकारची कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# राशीनमध्ये महात्मा फुले समता परिषदेची शाखा स्थापन

## ओबीसींच्या लढ्याला बळकटी देण्यासाठी संघटनेचे कार्य - जिल्हाध्यक्ष लोंढे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, कर्जत (अहिल्यानगर) :** महात्मा जोतिबा फुले यांच्या समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील राशीन येथे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या शाखेचे उद्घाटन नुकतेच उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ओबीसी महामंडळाचे माजी अध्यक्ष बापूसाहेब भुजबळ होते. प्रमुख उपस्थिती म्हणून अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचे स्वीय सहाय्यक रवीभाऊ सोनवणे, समता परिषदेचे प्रदेश प्रचारक डॉ. नागेश गवळी, जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, जिल्हा कार्याध्यक्ष अर्जुन मेहेत्रे, महिला जिल्हाध्यक्षा संगीता ढवळे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिंदे प्रमुख उपस्थित होते.

या कार्यक्रमाला कर्जत तालुकाध्यक्ष संभाजी गदादे, शहराध्यक्ष स्वप्निल वाघ, शाखा अध्यक्ष संदीप राऊत, उपाध्यक्ष मंगेश अवसरे, कार्याध्यक्ष नितीन सायकर, सचिव सागर अनारसे, प्रसिद्धी प्रमुख अक्षय राऊत, सोमनाथ धाडगे यांच्यासह पदाधिकारी व ग्रामस्थ या वेळी मोठ्या उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे म्हणाले, ओबीसींच्या लढ्याला बळकटी देण्यासाठी आणि महात्मा फुले यांचे विचार गावागावात पोहोचवण्यासाठी समता परिषदेचे कार्य सुरू आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक गावात शाखा स्थापन करून वंचित, शोषित समाजाला संघटित करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी समता परिषदेच्या शाखेच्या माध्यमातून गावात शैक्षणिक, सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबवण्याचा ठराव करण्यात आला. कार्यक्रमाला ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद लाभला.

# वरुळ कन्या विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा संपन्न



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०२, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील एच .आर. पटेल कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वरुळ येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्रा.एम.व्ही पाटील व प्रमुख पाहुणे विद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.जी. पाटील होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यक्षांच्या हस्ते लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात एम.व्ही.पाटील यांनी विद्यार्थिनींना या महान विभूतींचे राष्ट्रप्रेम, समाजसेवा, शिक्षणनिष्ठा, आणि संघर्षमय जीवनातील प्रेरणादायी विचार आत्मसात करून जीवनात आचरणात आणण्याचे आवाहन केले.विद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.जी. पाटील यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थिनींना प्रभावी वक्तृत्व कलेचे महत्त्व तसेच महापुरुषांच्या विचारांचा अभ्यास करण्याची प्रेरणा दिली.

वक्तृत्व स्पर्धा इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी या दोन गटात घेण्यात आली .एकूण ४५ विद्यार्थ्यांनींनी भाग घेतला. इयत्ता ५ वी ते ७ वी या गटात प्रथम- प्रीती किशोर वाकडे इयत्ता ७ वी, द्वितीय- मनस्वी प्रमोद पाटील इयत्ता ७ वी, तृतीय -तृप्ती समाधान सावळे इयत्ता ७ वी व जान्हवी राहुल पाटील इयत्ता ५ वी. तसेच इयत्ता ८ वी ते १० वी या गटात प्रथम- श्रद्धा दीपक गिरासे इयत्ता ८ वी ,द्वितीय -उर्वशी योगेश पाटील इयत्ता ८ वी, तृतीय- गुंजन दिलवरसिंग गिरासे इयत्ता ९ वी, या विद्यार्थिनी बक्षीस पात्र झाल्या. परीक्षक म्हणून श्रीमती एच.एस.गवळी व श्रीमती टी.ए.ब्राह्मणे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन आर. एम .मोरे व आभार प्रदर्शन बी.ए .पाटील यांनी केले. कार्यक्रमासडी.एन.माळी, डी. टी.चित्ते, पी.बी.वाघ , जे.एल. पाटील, वाय. एस .सोनवणे, शबिना अन्सारी, पी .एस .सावळे, पी .व्ही. महाजन, बापू भील, संजय शिरसाठ, अभिजीत ईशी, सुनील कोळी उपस्थित होते.

# अमली पदार्थ प्रतिबंधासाठी उपाययोजना करा - डॉ.भोयर



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** तंत्रज्ञानाचा उपयोग करुन अनेक सायबर गुन्हे वाढत असून, सामान्य नागरिकांचे हक्काचे पैसे परस्पर वळविण्याचे प्रकार निदर्शनास येत आहे. सोबतच अमली पदार्थांची तस्करी, वाहतूक, विक्री आणि सेवन ही सुद्धा अतिशय गंभीर बाब आहे. या दोन्ही प्रकारच्या गुन्ह्यांवर पोलीस यंत्रणेने विशेष लक्ष देऊन प्रभावी उपाययोजना कराव्यात, असा निर्देश गृहराज्यमंत्री (ग्रामीण) डॉ.पंकज भोयर यांनी दिला. पोलीसअधीक्षक कार्यालय येथे जिल्ह्यातील पोलीस यंत्रणेचा आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वसुमना पंत, पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक आदी उपस्थित होते.

डॉ.भोयर म्हणाले, चंद्रपूर हा औद्यागिक आणि राज्याच्या सीमेवर असलेला जिल्हा आहे. त्यामुळे गोवंश तस्करी रोखण्यासाठी सीमेवरील नाक्यांवर कडक तपासणी करावी. आवश्यक असल्यास तेथे सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे नियोजन करावे. नाक्यांवरील पथकाद्वारे योग्य कारवाई होते की नाही, हे तपासण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आकस्मिकपणे भेटी द्याव्यात. गावागावातील पोलीस पाटलांच्या कार्यशाळा घेऊन त्यांना, त्यांचेया जबाबदाऱ्या आणि त्यांच्याकडून काय अपेक्षित आहे, याबाबत मार्गदर्शन करा. पोलीस यंत्रणेने आपले गुप्त खबऱ्यांचे जाळे वाढवावे. नागरिकांशी नियमितपणे संवाद साधला तर बऱ्याच गोष्टींची माहिती पोलिसांना प्राप्त होते. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसोबत इतर पोलिसांचा आणि कर्मचाऱ्यांचा सुध्दा चांगला संवाद असणे गरजेचे आहे, असेही डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले.

# पूरसंकट गडद! चंद्रभागेची वाढती पातळी पाहून प्रशासन अलर्ट; आ.आवताडे घटनास्थळी



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०२, पंढरपूर :** उजनी तसेच वीर धरणातून भीमा नदीपात्रात एक लाख क्युसेकहून अधिक पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने चंद्रभागा नदी दुथडी भरून वाहू लागली आहे. नदीच्या पाणीपातळीत सातत्याने वाढ होत असल्यामुळे पंढरपूर शहरासह नदीकाठच्या सखल भागांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. रविवारी व्यास नारायण झोपडपट्टी परिसरात पाणी शिरण्यास सुरुवात झाल्यानंतर प्रशासनाने तातडीने खबरदारीचा उपाय म्हणून येथील ५० कुटुंबांचे उपजिल्हा रुग्णालयासमोरील रायगड भवन येथे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले. पूरस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पूरग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी केली. व्यास नारायण व अंबाबाई झोपडपट्टी परिसराला भेट देत त्यांनी नागरिकांशी संवाद साधला आणि सुरू असलेल्या मदत व बचाव कार्याचा आढावा घेतला.यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगोटे, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. चंद्रभागेची वाढती पाणीपातळी लक्षात घेऊन सखल भागातील नागरिकांना वेळेत सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्याचे निर्देश आमदार आवताडे यांनी महसूल, नगर परिषद, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाला दिले. पूरस्थितीवर चोवीस तास लक्ष ठेवून सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.नगर परिषद, महसूल प्रशासन, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात असून आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन आमदार आवताडे यांनी केले. दरम्यान, धरणातून सुरू असलेला मोठ्या प्रमाणातील पाण्याचा विसर्ग आणि चंद्रभागेची वाढती पाणीपातळी लक्षात घेता प्रशासनाने सतर्कतेचा इशारा कायम ठेवला असून नदीकाठच्या नागरिकांना अनावश्यकपणे नदीपात्र जवळ न जाण्याचे आणि सुरक्षिततेच्या सर्व सूचना पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# बभळाज विद्यालयात जागतिक स्काऊट व गाईड स्कार्फ दिवस कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०२, शिरपूर (धुळे) :** शिरपूर-तालुक्यातील बभळाज येथील आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय जागतिक स्कार्फ दिवस कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. एल.तवर होते. लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्य अर्पण करण्यात आले. मुख्याध्यापक आर.एल.तवर यांनी स्काऊट व गाईड चळवळीची माहिती, स्काऊट विषयाचे महत्त्व, स्काऊट हा समाज सेवक असतो.समाज हिताची कामे करत असतो. या विषयी विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना दिली. स्काऊट शिक्षक बी.व्ही. मोरे यांनी जागतिक स्कार्फ दिवस साजरा करण्याचे महत्त्व विषद केले.या कार्यक्रमाच्या प्रसंगी आर.टी.पाटील, बी.बी. लोहार, एस.जी. वाडीले, डी.सी.बडगुजर, डी.ए. पावरा, एस.जी. भामरे,आर.आर.गोपाल,शितल पाटील, जे.एन.पाटील, डी.के.पाटील, एस.एस.पाटील, एस.एम.पाटील, नंदकिशोर चौधरी, रोहीत बागुल, राहुल चौधरी उपस्थित होते.

# ईपीएस - ९५ पेन्शनधारकांच्या समस्यांवर तातडीने तोडगा काढा

## खा.धानोरकरांची दिल्लीत केंद्रीय मंत्र्यांकडे मागणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** ईपीएस -९५ पेन्शनधारकांच्या प्रलंबित व न्याय्य मागण्यांवर त्वरित निर्णय घेऊन देशातील व चंद्रपूर-वणी- आर्णी लोकसभा क्षेत्रातील हजारो वृध्द पेन्शनधारकांना न्याय द्यावा, यासाठी खा. प्रतिभा धानोरकर यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री डॉ.मनसुख मांडविया यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. ईपीएस -९५ राष्ट्रीय संघर्ष समिती (जिल्हा चंद्रपूर) च्या वतीने जिल्हा सचिव प्रकाश राठोड व त्यांच्या प्रतिनिधीमंडळाने दिलेल्या निवेदनाची गंभीर दखल घेत खा. प्रतिभा धानोरकर यांनी दिल्ली गाठून हा प्रश्न केंद्रीय पातळीवर तातडीने लावून धरला. अनेक वर्षाच्या समर्पित सेवेवंतरही ईपीएस-९५ योजनेअंतर्गत निवृत्त कर्मचाऱ्यांना अत्यंत तुटपुंजी पेन्शन मिळत असून, सध्याच्या वाढत्या महागाईच्या काळात वृध्द पेन्शनधारकांना सन्मानाने जगणे आणि वैद्यकीय उपचार घेणे कठिण झाले आहे, ही बाब खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.

या समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी ईपीएस-९५ पेन्शनधारकांना दरमहा किमान ७,५००/- अधिक महागाई भत्ता मंजूर करण्याची, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पात्र कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष वेतनावर उच्च पेन्शनचा पर्याय विनाभेदभाव उपलब्ध करुन देण्याची आग्रही मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली.

याशिवाय, सर्व ईपीएस-९५ पेन्शनधारक व त्यांच्या जोडीदारास मोफत वैद्यकीय सुविधा पुरविणे आणि या योजनेपासून वंचित राहिलेल्या निवृत्त कर्मचाऱ्यांना दरमहा ५ हजार पेन्शन देऊन दिलासा देणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

देश आणि क्षेत्राच्या औद्योगिक विकासात आयुष्यभर मोलाचे योगदान देणाऱ्या या ज्येष्ठ नागरिकांना वयाच्या या टप्प्यावर योग्य आर्थिक व सामाजिक संबल मिळणे हा त्यांचा हक्क असल्याचे खासदार प्रतिभा घानोरकर यांनी छामपणे मांडले.

खा. प्रतिभा धानोरकर यांनी केंद्रीय कामगार मंत्र्यांना विनंती केली की, या गंभीर व संवेदनशील विषयावर वैयक्तिक लक्ष घालून आगामी कॅबिनेट बैठकीत अथवा मंत्रालयीन स्तरावर सकारात्मक निर्णय घेण्यात यावा. या निवेदनाचा स्वीकार करत केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी पेन्शनधारकांच्या मागण्यांवर योग्य व सकारात्मक कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

# विद्यार्थ्यांनी शिस्त, जिद्द, आत्मविश्वास व मेहनत करण्याची वृत्ती अंगी जोपासली पाहिजे - जिल्हाधिकारी पंत

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी शिस्त, जिद्द, आत्म विश्वास आणि मेहनत करण्याची वृत्ती जोपासली पाहिजे, शालेय अभ्यासक्रम ाबरोबरच आपले चांगले व्यक्तिमत्व घडविले पाहिजे, असे मत ०१ ऑगस्ट २०२६ रोजी लोकमान्य टिळक स्मारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित लोकम ान्य टिळक विद्यालय तथा कनिष्ठ म हाविद्यालय चंद्रपूर, लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर, लोकमान्य टिळक ज्ञान मंदिर कॉन्व्हेंट चंद्रपूर आणि कै. चंद्रभागाबाई मद्दीवार उच्च प्राथमिक विद्यालय अहेरी, जिल्हा गडचिरोली या चारही विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथीचा कार्यक्रम स्थानिक प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह चंद्रपूर येथे ज्येष्ठ विधिज्ञ तथा लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. रवींद्र भागवत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रम ाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थितांना मार्गदर्शन करताना आपले मत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधीज्ञ तथा लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. रवींद्रजी भागवत होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी वसुमना पंत या होत्या. विशेष उपस्थितीत मंडळाचे उपाध्यक्ष श्रीपाद मुनगंटीवार, सचिव गांगेय सराफ यांची मंचावर उपस्थिती होती.




कार्यक्रमाची सुरुवात लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेला दिप प्रज्वलित करुन माल्यार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सर्वप्रथम शारदा स्तवन, लोकमान्य स्तवन, स्वागत गीत, शालेय गीत, समुह गीत शालेय विद्यार्थ्यांनी सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मंडळाचे सचिव गांगेय सराफ सर यांनी केले. त्यात चारही शाळेच्या उत्तरोत्तर होणाऱ्या शैक्षणिक प्रगतीच्या अहवालाचे वाचन केले. कार्यक्रम ाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या जिल्हाधिकारी वसुमना पंत यांना ॲड. रवींद्रजी भागवत व सचिव गांगेय सराफ यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. तदनंतर जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी मार्गदर्शन करताना सांगितले कि, विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी शिस्त, जिद्द, आत्मविश्वास व मेहनत करण्याची सवय लागली की आपण हाती घेतलेल्या कार्यात नक्कीच यश प्राप्त करता येते. यावेळी त्यांनी शालेय अभ्याक्रमा व्यतिरिक्त विविध उपक्रम, देशाच्या इतिहासाची ओळख विद्यार्थ्यांना करुन दिली जाते, विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडण्यास मदत होते, शाळा म्हणजे निव्वळ अभ्याक्रम पूर्ण करणे नव्हे, तर अभ्यासक्रमाबरोबर विविध अंगाचा(क्षेत्राचा) येथे अभ्यास केला जातो, त्याबद्दल शाळेकडून राबविल्या जाणाऱ्या या उपक्रमाचे जिल्हाधिकारी पंत यांनी विशेष कौतुक केले.

याप्रसंगी मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. माधवी भट (लोकमान्य टिळक विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय चंद्रपूर) लिखित मराठीतील 'चंद्रावती रामायण' या पुस्तकाचे तर अनिल पेटकर सर(लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर) लिखित इंग्रजी भाषेतील 'व्हेन सायलेंस स्पिक्स....' पुस्तकाचे विमोचन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात ॲड. रवींद्र भागवत यांनी सांगितले की, आपण कोण आहोत, मी कोण आहे हे आपण ओळखलं पाहिजे. हे जर का एकदा लक्षात आलं की, मला काय व्हायचं आहे हे लवकर लक्षात येते. आपल्यात चांगले संस्कार रुजले पाहिजे, शिस्त असायला पाहिजे, आपण टिळकांची पुण्यतिथी किंवा जयंती का साजरी करतो. विद्यार्थ्यांनी व बाकी सगळ्यांनी आम्ही आपल्या मनात पक्क केलं पाहिजे संकल्प केला पाहिजे की आम्ही सुध्दा लोकमान्य सारखे होण्याचा प्रयत्न करु होईल किंवा नाही ही नंतरची गोष्ट आहे पण एक पाऊल त्या दृष्टीने आम्ही समोर टाकू एवढा तरी एक निश्चय केला तरी आपण या पुण्यतिथीचा कार्यक्रम खरोखर यशदायी होईल.

या कार्यक्रमाला माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर, जिल्हा संघचालक तुषार देवपुजारी, मनपा च्या महापौर संगीता खांडेकर, डॉ.मंगेश गुलवाडे, व्यवस्थापन मंडळाचे कोषाध्यक्ष प्रशांत घट्टूवार, दत्तप्रसन्न महादाणी, ॲड.अभय पाचपोर, डॉ.प्रवीण पंत, डॉ. राम भारत, अरुण मदनकर, मुख्याध्यापक प्रफुल्ल राजपुरोहित, मुख्याध्यापिका अर्चना दुर्गपुरोहित, प्रांजली महादाणी, रश्मी कावडकर, संतोष जोशी तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

याप्रसंगी १० वी, १२ वी बोर्डाच्या परीक्षेत घवघवीत यश प्राप्त करणाऱ्या तसेच क्रीडा, कला, सांस्कृतिक, विज्ञान अशा विविध क्षेत्रात यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवराच्या हस्ते रोख बक्षिसे व सन्मानचिन्हे प्रदान करुन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन (संस्कृत भाषेतून) वर्ग १० वी ची विद्यार्थीनी अश्विनी कांबळे आणि वर्ग ८ वी चा विद्यार्थी तरुण शेंडे यांनी केले. तर आभार मंडळाचे उपाध्यक्ष श्रीपाद मुनगंटीवार यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# ब्रम्हलीन पायमोडे महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** प्रभू राम चंद्रांच्या पदस्पर्शाने व भगवान श्री ढोकेश्वरच्या वास्तव्याने पावन झालेल्या टाकळी ढोकेश्वर येथे भक्तीचा महासंगम होणार आहे. वारकरी संप्रदायाचे माहेरघर असलेल्या श्रीक्षेत्र टाकळी ढोकेश्वर येथील श्री स्वामी समर्थ नगरमध्ये वसलेल्या ब्रम्हलीन सद्गुरु विठ्ठल महाराज पायमोडे यांच्या २७ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघणार आहे.

हा पवित्र सोहळा मंगळवार दि.०४ऑगस्ट २०२६, आषाढ कृष्ण षष्ठी ते मंगळवार दि. ११ ऑगस्ट २०२६, आषाढ कृष्ण चतुर्दशी या कालावधीत श्री स्वामी समर्थ, ब्रम्हलीन सद्गुरु विठ्ठल महाराज पायमोडे समाधी देवस्थान येथे संपन्न होणार आहे.

आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, सप्ताहातील सात ही दिवस भक्तांसाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे ४ ते ६ काकडा भजनाने दिवसाची सुरुवात सकाळी ७.३० ते ११.३० ह.भ.प. बाळासाहेब महाराज पायमोडे, ह.भ.प. भिम ाजी मुळे व सुशिलाताई कदम यांच्या नेतृत्वाखाली ज्ञानेश्वरी पारायण सायंकाळी ४.३०ते ५.३० नामवंत प्रवचनकारांचे कीर्तनरूपी प्रवचन सायंकाळी ५.३० ते ६.३० सामुदायिक हरिपाठ रात्री ७ ते ९ विविध भजनी मंडळांचा हरिकीर्तनाचा कार्यक्रम दररोज वेगवेगळ्या



गावातील महाराज प्रवचन व कीर्तन सेवा देणार आहेत. ह.भ.प. मारुती महाराज अनंत गुरूजी, ह.भ.प. रमेश महाराज थोरात, ह.भ.प. कैलास महाराज येवले, ह.भ.प. धनंजय महाराज उदावंत यांची कीर्तनसेवा विशेष आकर्षण ठरणार आहे.

सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत गावातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. यासाठी गावातील सर्व गायनाचार्य, वादक व भाविक सहभागी होणार आहेत. सांगता समारंभ मंगळवार दि. ११ ऑगस्ट रोजी होणार आहे. यादिवशी सकाळी ९ ते ११ या वेळेत वैराग्यमुर्ती ह.भ.प. डॉ. नारायण महाराज जाधव यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर आनंद उद्योग समूह माजरवाडी खंडागळे बंधू यांच्या वतीने म हाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा ह.भ.प. वैकुंठवासी बबन महाराज पायम ोडे यांच्या कृपाशिर्वादाने आणि ह.भ.प. सद्गुरु पांडुरंग अनंत मोरे व ह.भ.प. डॉ. नारायण महाराज जाधव यांच्या प्रेरणेने होत आहे. सप्ताहकाळात दररोज नाश्ता, दुपारचे व रात्रीचे भोजन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. आदिनाथ भजनी मंडळ माजरवाडी व सर्व शिष्यगण ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर यांनी सर्व वारकरी, भजनी मंडळे व भाविकांना या भक्तिमय सोहळ्यात तन-मन-धनाने सहभागी होऊन ज्ञानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# गुरुपौर्णिमा उत्सवाच्या तीन दिवसांत साईचरणी तब्बल ८ कोटींचे दान

## संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांची माहिती



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, शिर्डी (अहिल्यानगर) :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेतर्फे, शिर्डीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्री गुरुपौर्णिमा उत्सवाला यंदाही देश विदेशातील साईभक्तांचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद लाभला. साईबाबांना आपले सद्गुरू मानणाऱ्या लाखो भाविकांनी साई चरणी नतमस्तक होत गुरुदक्षिणा म्हणून भरभरून दान अर्पण केलं. गुरुपौर्णिमा उत्सवाच्या अवघ्या तीन दिवसांत संस्थानला ७ कोटी ८१ लाख १३ हजार रुपयांची देणगी प्राप्त झाली. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा सुमारे दीड कोटी रुपयांनी वाढ झाली असून, गेल्या वर्षीचा विक्रम मोडला असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

सदर देणगी मध्ये रोख स्वरुपात रुपये ०२ कोटी ०४ लाख ३५ हजार ५५७ दक्षिणा पेटीत प्राप्त झाली असून, देणगी काऊंटरवर ०१ कोटी २५ लाख ४७ हजार ९३५ रुपये, पी.आर.ओ. देणगी ८७ लाख १४ हजार, डेबीट क्रेडीट कार्ड,ऑनलाईन देणगी, चेक डी. डी.देणगी, मनी ऑर्डर असे एकूण ०२ कोटी ०७ लाख ८४ हजार ७०१ रुपये, परकीय चलनाद्वारे ०५ लाख ६५ हजार ९९१ रुपये, सोने १,१२५.५७० ग्रॅम प्राप्त झाले असून त्याचे मुल्य रक्कम रुपये ०१ कोटी ४६ लाख ७४ हजार ५४४ व चांदी २,३७६.५०० ग्रॅम प्राप्त झाली असून तीचे मुल्य रक्कम रुपये ०३ लाख, ९० हजार ६४९ असे आहे.

श्री गुरूपौर्णिमा उत्सवासाठी देश विदेशातून साधारणतः ०३ ते चार लाखाहून अधिक साईभक्तांनी साईदर्शनाचा लाभ घेतला. त्याच बरोबर लाखो भाविकांनी दर्शनासह साईबाबांच्या चरणी दान केले आहे. उत्सव कालावधीमध्ये श्री साईप्रसादालयाद्वारे सुमारे ०१ लाख ९४ हजार २८५ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा तर ३९,६११ अन्नप्रसाद पाकिटांचा लाभ घेतला. दर्शन रांगेत ०१ लाख ६५ हजार २०० साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप करण्यात आले. या कालावधीत ७१ लाख ०७ हजार ३६० रूपये सशुल्क प्रसादरुपी लाडू पाकीटांच्या माध्यमातून प्राप्त झाले.

उत्सव काळात हजारो साईभक्तांनी संस्थानच्या साईप्रसाद निवासस्थान, साईबाबा भक्त निवासस्थान, व्दारावती निवासस्थान, साई आश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा आदी ठिकाणांबरोबर अतिरिक्त निवास व्यवस्थेकरीता उभारण्यात आलेल्या मंडपात निवास व्यवस्थेचा लाभ घेतला.

तसेच साईधर्मशाळा येथे विविध भागातून आलेल्या ३९ पालख्यांमध्ये पदयात्री साईभक्तांनी निवास व्यवस्थेचा लाभ घेतला असे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सांगितले.

## थोडक्यात बातम्या

### श्रीवास नगर मध्ये प्रबुद्ध विहार समाज भवनचे भूमिपूजन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०२, नागपूर :** राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष पुढाकाराने महादुला येथील श्रीवास नगर गोडबोले चौक येथील प्रबुद्ध विहारच्या विकासाकरिता दलितवस्ती अंतर्गत १३ लाख रुपये निधी समाज भवन करिता नगर पंचायत द्वारे उपलब्ध करून दिला.नियोजित समाज भवनाचे भूमिपूजन महादुला नगरपंचायतच्या नगराध्यक्ष हेमलताताई मनोज सावजी यांच्या शुभहस्ते नुकतेच पार पडले. याप्रसंगी मुख्याधिकारी स्वप्निल वैद्य, उपाध्यक्ष वैशाली वैशालीताई पखीड्डे, मनोज सावजी, सचिन पाटील, सभापती नंदाताई तुरक, स्वातीताई पटले, अजय सोलंकी नगरसेवक, स्वातीताई लांडे, गोपाल नैकाने, गंगाताई जैन, सोनूताई उघडे, संध्याताई साबळे, प्रतिभाताई गजभिये, प्रितम लोहासारवा, मोहसीन शेख, रामबाबू तोडवाल, पंकज ढोणे, पवन पखीड्डे, तिलक गजभिये, विजय जैन, अंकित तूरक, निशांत पखीड्डे, सिद्धार्थ शेंडे, राहुल बागडे, विश्वनाथ चव्हाण, प्रविण घोडेस्वार, अजय मानकर उपस्थित होते.कार्यक्रमाचे संयोजक अमरजीत गोडबोले यांनी सूत्रसंचालन करून उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेकरिता नमिता गोडबोले, राहुल इंगोले, निकिता लोणारे, राहूल लोणारे, राजेश बोरकर, निरंजन वालदे, भाग्यश्री चिंधालोरे, प्रितेश वानखेडे, प्रविण वानखेडे, कमलेश खोब्रागडे, दिलीप चिंधालोरे, प्रज्ञा नारनवरे, दुर्गा इंगोले, बबिता वाणी, विशाल जनबंधू, मनीषा वाणी, शांताबाई खोब्रागडे, आशाजी यादव यांनी प्रयत्न केले.

### भानेगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०२, नागपूर :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ जयंती मातंग समाजाच्या वतीने भानेगाव येथील संत रविदास सभागृहात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अण्णाभाऊ साठे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संत रविदास यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शालिनी चवरे होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक राहुल हिरवाळे, विक्री कर निरीक्षक प्रविण शेंडे, राजू साळवे, संजय ठोसर, शामराव सरोदे, सुनील जालंदर, मुकेश नायडू, अरविंद तांडेकर, रील स्टार आदी मंचावर उपस्थित होते. मंचावर उपस्थित मान्यवरांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना वंचितांच्या व शोषितांच्या वेदना आपल्या शाहीर व लेखणीतून प्रभावीपणे मांडल्या असल्याचे सांगितले. शिवाय संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि गोवा मुक्ती संग्रामा बद्दल माहिती दिली. यावेळी आण्णाभाऊ साठे यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेऊन कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्य आयोजक आकाश बावणे, राजू लोखंडे, विकास बावणे, संजय खडसे, आशिष काळे, देवा बावणे, कैलास खडसे, चुडामन लोखंडे, ईश्वर बावणे, अशोक काळे, भगवान काळे, रोहित लांडगे, हुनुमान खडसे, शुभम काळे, बादशाह बावणे, देविदास बावणे, किशोर खंडाईत, सहदेव काळे आदींनी सहकार्य केले.

### सह्याद्री रत्न गुण गौरव पुरस्कार जाहीर

#### (आदर्श सरपंच सौ.संध्याताई देशमुख)

#### (आदर्श ग्रामविकास अधिकारी श्री.गोरख गायकवाड)



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०२, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील रांजणगाव येथील कत्येव्य दक्ष, स्वाभिमानी नेतृत्व, समाजसेवेचा वारसा घेऊन शाषनाच्या सर्व समाज उपयोगी योजना सर्व सामान्य जनतेला पोहच करण्याचे काम करण्याचे साहस करणार्या सरपंच म्हणजे संध्याताई महेश देशमुख यांनी समाज उपयोगी कामाची दखल घेऊन नालंदा ऑर्गनायझेशन आयोजित राज्यस्तरीय सह्याद्री रत्न गुण गौरव पुरस्कार देऊळ बंद फेम अभिनेत्री आर्या घारी यांच्या हस्ते पुणे येथील कार्यक्रमात आदर्श सरपंच संध्याताई देशमुख यांना पुरस्कार देउन सन्मानित करण्यात आले, तसेच रांजणगावचे कर्त्यव्य दक्ष ग्रामविकास अधिकारी गोरख अर्जुन गायकवाड याना ही पुरस्कार देउन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या पुरस्काराने रांजणगाव येथील उपसरपंच शिवाजी शिंदे, माजी सरपंच शरद सरोदे, बाबा जवक, बंटी साबळे, महेश देशमुख व सर्व ग्रामपंचायत सदश्य, सेवा सोसायटीचे चेअरमन अनिल जवक, पारनेर तालुका भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, पारनेर दुध संघाचे दत्ता नाना पवार यांनी अभिनदन केले आहे.

### टाकळीढोकेश्वरमध्ये अण्णाभाऊ साठे जयंती साजरी; लोकमान्य टिळकांना अभिवादन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतीच्या सभागृहात ग्रामपंचायतीच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. तसेच लोकमान्य लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिम ेला पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले. त्यांच्या क्रांतिकारी विचारांचा आणि समाजप्रबोधनाच्या कार्याचा यावेळी जागर करण्यात आला. टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात झालेल्या कार्यक्रमात या दोन्ही महामानवांच्या साहित्य,समाजकारण आणि सामाजिक समतेसाठीच्या योगदानावर प्रकाश टाकण्यात आला. या कार्यक्रमास टाकळी ढोकेश्वर गावच्या सरपंच अरुणा खिलारी, माजी सरपंच शिवाजी खिलारी, ज्येष्ठ कार्यकर्ते श्रावण गायकवाड, माजी ग्रामपंचायत सदस्य दीपक साळवे, विक्रम झावरे, बबलू झावरे, माळीभाऊ रांधवन, देविदास आल्हाट, सुनील माकरे, पिंटू जाधव, संकेत झावरे, संदीप आल्हाट, श्यामा आल्हाट, सुशांत आल्हाट, प्रतीक चव्हाण, लक्ष्मीकांत आल्हाट, गणेश वैराळ यांच्यासह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी एकत्र येऊन दोन्ही थोर पुरुषांना आदरांजली अर्पण केली.